CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | बुधवार, दि. ५ जुलै २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २७६ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

## काँग्रेसदेखील फुटीच्या उंबरठ्यावर? : पृथ्वीराज चव्हाणांचा गौप्यस्फोट

**कराड** : शिवसेनेनंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उभी फूट पडल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांना मोठा धक्का बसला आहे. विरोधी पक्षनेते आणि आताचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बंडखोरी केल्यानंतर ८ मंत्र्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

दरम्यान, राष्ट्रवादीनंतर काँग्रेसदेखील फुटीच्या उंबरठ्यावर असल्याचा गौप्यस्फोट काँग्रेसचे नेते आणि माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केला आहे. पृथ्वीराज चव्हाण यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. अजित पवारांनी राष्ट्रवादीच्या ८ आमदारांसह मंत्रीपदाची शपथ घेतली. त्यानंतर राष्ट्रवादी पक्षामध्ये अनेक बदल होत गेले. पण आता काँग्रेसदेखील या फुटीच्या उंबरठ्यावर असल्याचं पृथ्वीराज चव्हाण म्हणाले. राष्ट्रवादीचे आमदार सत्तेत सहभागी झाल्याने काँग्रेस आता विरोधी पक्षनेता पदावर दावा सांगण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. तर काँग्रेस देखील दोन गटात विभागलं जाणार असल्याचं म्हटलं जात आहे. काँग्रेसच्या फुटीच्या चर्चा या काही पहिल्यांदा नाही असं विधान आमदार बच्चू कडू यांनी काही महिन्यांपूर्वी केलं होतं. तर त्यांनी काँग्रेसला उद्देशून महाविकास आघीडीचे १० ते १५ आमदार फुटतील असा दावा देखील त्यांनी केला होता.



# पवारांच्या एन्ट्रीने भाजपमध्ये ‘धमाका‘, ‘लेटरबॉम्ब‘ने फडणवीसांना दिला धक्का

## ज्यांच्याशी लढलो, त्यांच्या मांडीला मांडी लावायची काय?

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अजित पवार यांना सत्तेत सहभागी करून घेतल्याबद्दल भाजप नेते देवेंद्र फडणवीस हे अतिआत्मविश्वास दाखवत आहेत. पण पुढे जात असताना फडणवीस हे मागे वळून पाहात नाहीत, असे दिसते. पवारांच्या एन्ट्रीने भाजपात आता नाराजीचे, अस्वस्थेचे धमाके होऊ लागले आहेत. भाजपच्या एका पदाधिकाऱ्यानेच फडणवीसांना एक लेटर पाठवून याप्रकरणी जाब विचारण्याची हिम्मत दाखवली आहे. त्या पत्रातून राज्यातील भाजपा कार्यकर्त्यांच्या मनात दडलेल्या संतापाला वाचा फोडली. फडणवीस साहेब...शरद पवारांच्या नादात आपल्याच निष्ठावंतांची जिरणार नाही ना? असा खडा सवाल त्या पत्रात विचारला गेला आहे. ज्यांच्याशी लढलो, त्यांच्याच मांडीला मांडी लावून बसायचे काय? अशा खरमरीत शब्दात फडणवीसांना जाब विचारला गेला आहे.**

राज्यात मागील काही दिवसांपासून नाट्यमय राजकीय घडामोडी घडत आहेत. राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांची सहमती नसतानाही अजित पवारांना आपल्या सहकाऱ्यांसह वेगळा निर्णय घेण्यास भाग पाडून भाजपने कुरघोडी केल्याची चर्चा रंगत आहे. मात्र भाजपची ही खेळी पुण्यातील भाजप युवा मोर्चाच्या एका पदाधिकाऱ्याला रुचली नसून सदर पदाधिकाऱ्याने भाजप नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहीत नाराजी व्यक्त केली आहे.

पुणे ग्रामीण भाजपा युवा मोर्चाचे सरचिटणीस नवनाथ पारखी यांनी फडणवीसांना पत्राद्वारे पाच प्रश्न विचारले आहेत. राष्ट्रवादीच्या सत्तेतील सहभागामुळे पुणे जिल्ह्यात मोठे प्रश्न उपस्थित झाले आहेत. एवढे दिवस ज्यांच्याविरोधात काम केले आता त्यांच्याच मांडीला मांडी लावून बसायचे का? असा प्रश्न देखील त्यांनी उपस्थित केला आहे. भाजप पदाधिकाऱ्याच्या या पत्रामुळे तळागाळातील कार्यकर्त्यांत संभ्रमाचे वातावरण तयार झाल्याचे समोर आले आहे.केवळ पुण्यातूनच नाही तर भाजपच्या मंत्र्यांमधून, राज्यातील भाजप नेते तसेच पदाधिकाऱ्यांमधूनही स ु प्त संताप व्यक्त केला जात आहे. अजित पवारांचे खुद्द पक्षातील नेत्यांशीच पटत नव्हते तेव्हा सत्तेतील मंत्र्यांशी,भाजपा व शिंदे गटातील नेत्यांशी त्यांचे जमेलच कसे? असा सूर भाजपमध्ये उमटत आहे.



### ताकत कुणाची वाढणार?

या शपथविधीने भाजपची की राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद वाढणार? मोठ्या साहेबांची जिरवण्याच्या नादात भाजपच्या निष्ठावंतांची जिरणार नाही ना? आम्हा निष्ठावंतांची काही सोय केलीये का? असे पत्राद्वारे पाच प्रश्न पारखी यांनी फडणवीसांना विचारले आहेत. साहेब जमले तर जरूर उत्तर द्या, अशी सादही त्यांनी घातली आहे. आमच्यासारख्या निष्ठावंत कार्यकर्त्यांनी आता काय करायचे, असा प्रश्नही पारखी यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना विचारला आहे.

### आलेल्यांचे काय होणार?

अजित पवारांच्या पायात पाय घालण्याच्या प्रकाराला कंटाळून राष्ट्रवादीतील अनेक नेते पक्ष सोडून भाजपमध्ये आले. त्यांना खासदारकी,आमदारकी दिली गेली.जो नेता नको होता,त्यालाच सत्तेत घेऊन आमच्या डोक्यावर कशाला बसवला? अशी भावना भाजपमधील आयारामांमधून व्यक्त होत आहे.दरम्यान राष्ट्रवादीमधून जे नेते भाजपच्या वाटेवर होते ते आता आपली भूमिका बदलण्याच्या मनस्थितीत असल्याचे सांगण्यात येते.

### तर विश्वासार्हता धोक्यात...

शिंदे गटाच्या १६ आमदारांना अपात्र ठरवून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना बाजूला सारले जाईल,अशी शक्यता वर्तवली जातेय. मात्र, भाजपच्या गोटातून हा दावा फेटाळून लावण्यात आला आहे. एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रिपदावरून बाजूला केल्यास भाजपची विश्वासर्हता धोक्यात येऊ शकते. त्यामुळे भविष्यात कोणताही प्रादेशिक पक्ष भाजपसोबत येण्याची तयारी दाखवणार नाही, असे भाजपच्या वरिष्ठ नेत्यांचे म्हणणे आहे.



## जॅकवेल कामाला पावसाचा व्यत्यय नाही : आयुक्त

### मुदतीत काम होणार

सुराज्य/सोलापूर

उजनी सोलापूर दुहेरी जलवाहिनीचेकाम नियोजनानुसार सुरूच आहे जॅकवेलच्या कामात पावसाचा व्यत्यय येणार नाही. कॉफरडॅम इंटॅक्ट केल्याने पावसातही हे काम पूर्ण करण्यात येत आहे. यामुळे जॅकवेलचे काम मुदतीत पूर्ण होईल, अशी माहिती महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांनी दिली.

उजनी सोलापूर दुहेरी जलवाहिनीचे काम नियोजनपूर्वक चार्टनुसार पोचमपाड कंपनीकडून सुरू आहे. दर आठवड्याला आयुक्त तेली-उगले त्याचबरोबर स्मार्ट सिटीचे चेअरमन असीम गुप्ता यांच्या माध्यमातून आढावा घेतला जात आहे. त्यामुळे या कामाला आता गती येत आहे. दरम्यान, पावसाळ्यापूर्वी जॅकवेलचे काम करणे गरजेचे होते. त्यानुसार जॅकवेलच्या कामांतर्गत कॉफरडॅम इंटॅक्ट केल्याने उर्वरित जॅकवेलचे काम पावसातही पूर्ण करता येणार आहे. यापूर्वी जे दुहेरी जलवाहिनीसाठी दुहेरी जलवाहिनी टाकण्यासाठी लागणारे पाईप्स शिल्लक होते ते सर्व पाईप टाकण्यात येत आहेत. एक हजार मीटर त्यापैकी शिल्लक आहेत. तेही लवकरच टाकण्यात येतील नियोजनपूर्वक चार्ट प्रमाणे या जलवाहिनी टाकण्याचे काम करण्यात येत आहे.



### पाणी तुंबल्याच्या तक्रारीनुसार कार्यवाही

अनेक ठिकाणी नाला परिसरात अतिक्रमण करून घरे बांधण्यात आली आहेत. काही लोक कचरा हा नाल्यातच टाकतात, यामुळे नाले तुंबले जातात, पाणी निचरा आणि घरात पाणी शिरल्याच्या तक्रारी जशा प्राप्त होतील, तसे महापालिका प्रशासनाकडून कार्यवाही करण्यात येत असल्याचे महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांनी स्पष्ट केले.

## नेर्लेत डोक्यात पाईप पडल्याने मजूर ठार

### एकावर गुन्हा दाखल

सुराज्य/सोलापूर

नेर्ले (ता.करमाळा) येथे बोअरवेल मधील गुंतलेली विद्युत मोटार काढताना डोक्यात लोखंडे पाईप पडून एक ५८ वर्षीय मजूर जागीच मयत झाले होते. ही घटना ३० जून रोजी ताराबाई बनसोडे यांच्या शेतात घडली होती. त्यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी करमाळ्याच्या पोलिसांनी अप्पासाहेब हनुमंत गवळी (रा. नेर्ले) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

भीमराव लाला गोडसे (वय ५९ रा.नेर्ले ता. करमाळा) असे मयत झालेल्या मजुराचे नाव आहे. ३० जून रोजी सकाळच्या सुमारास अप्पासाहेब गवळी या बोरवेलच्या ठेकेदाराने त्यांना कामासाठी म्हणून बनसोडे यांच्या शेतात नेले होते. बोअरवेल मधील गुंतलेली मोटर काढताना कप्पीचे लोखंडी पाईप डोक्यात पडल्याने भीमराव गोडसे हे जागीच मयत झाले होते. या प्रकरणात मयत भिमराव यांचा मुलगा सौदागर गोडसे (वय ३२) यांनी करमाळा पोलिसात तक्रार दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी अप्पासाहेब गवळी याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. हवालदार रणदिवे पुढील तपास करीत आहेत.

## डिकसळ येथे पाण्याच्या टाकीत विष टाकले

सुराज्य/सोलापूर

डिकसळ (ता.मंगळवेढा) येथील ग्रामपंचायतीच्या पाण्याच्या टाकीत विषारी द्रव टाकल्याची घटना काल सोमवारी सकाळी उघडकीस आली.

याप्रकरणात मंगळवेढ्याच्या पोलिसांनी अनोळखी इसमाविरुद्ध सार्वजनिक रित्या लोकांच्या जीवितास धोका निर्माण केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. डिकसळ(ता.मंगळवेढा) येथे ग्रामपंचायतच्या वतीने पिण्याची टाकी बांधण्यात आली आहे. काल सकाळी पिण्याच्या पाण्यात दुर्गंधी येत असल्याचे पाहून नागरिकांनी तक्रार केली. तेव्हा हा प्रकार उघडकीस आला. पाण्याची तपासणी केली असता त्यामधे जनावरासाठी लागणारे विषारी द्रव टाकल्याचे उघडकीस आले. या घटनेची फिर्यादी राहुल केशव कांबळे (रा.डिकसळ) यांनी पोलिसात दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी अनोळखी इसमाविरुद्ध गुन्हा दाखल केला. पुढील तपास पोलीस करीत आहेत.



## मदर इंडिया झोपडपट्टीत तरुणाची आत्महत्या

**सोलापूर** : कुमठानाका परिसरातील मदर इंडिया झोपडपट्टीत राहणाऱ्या फारुक रसूल शेख (वय २५) याने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना सोमवारी रात्रीच्या सुमारास घडली. फारुक शेख याने काल रात्री ८ वाजेच्या सुमारास घरातील छताच्या लाकडी वाशाला नायलॉन दोरीने गळफास घेतला होता. दोरी तुटल्याने तो प्लॅस्टिकच्या ड्रमवर कोसळून बेशुद्ध पडला होता. रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला.

## संतोष पवार यांची राष्ट्रवादीतून हकालपट्टी

सुराज्य/सोलापूर

महाराष्ट्र राज्याच्या विद्यमान सरकारमध्ये सामील होणाऱ्या व उपमुख्यमंत्री मंत्री पदाची शपथ घेतलेल्या पक्षाच्या आमदारांना पाठिंबा दिल्याच्या कारणावरून राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी प्रदेश सचिव संतोष पवार यांची मंगळवारी पदावरून व पक्षातून हकालपट्टी केली आहे.



आपले हे कृत्य पक्ष, शिस्त तसेच पक्षाची ध्येयधोरणांच्या विरोधी आहे.

तसेच त्यांची कृती पक्षाच्या ध्येय धोरणांशी विसंगत आहे. पक्षाच्या सदस्यत्वावरून व चिटणीस पदावरून तातडीने बडतर्फ करण्यात आले आहे. यापुढे राष्ट्वादी युवक काँग्रेस पक्षाचे नाव, चिन्ह वापर करू नये, अन्यथा कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल असा इशाराही त्यांनी पत्रकातून दिला आहे.

### मला काढण्याचा अधिकार जयंत पाटलांना नाही

राष्ट्रवादीचे कार्यकारी अध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी प्रदेशाध्यक्ष म्हणून सुनील तटकरे यांची नियुक्ती करत जयंत पाटील यांची हकालपट्टी केली आहे. त्यामुळे पाटील मला पदावरून काढू शकत नाही. सुनील तटकरे यांचा आदेश अंतिम राहणार आहे, असे संतोष पवार यांनी सांगितले.

## तेलगावात दुचाकीची समोरासमोर धडक; जखमीचा मृत्यू


सुराज्य/सोलापूर

वेगाने जाणाऱ्या दोन दुचाकींची समोरासमोर धडक झाल्याने एका दुचाकी वरील कट्याप्पा धुडप्पा शिवशरण (वय ४० रा.भैरुवस्ती लिमयेवाडी) हे सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचार घेताना मंगळवारी सकाळी मयत झाले.

हा अपघात सिना तेलगाव (ता.उत्तर सोलापूर) येथे काल सोमवारी सकाळच्या सुमारास घडला होता. कट्याप्पा शिवशरण हे सेंट्रींगचे काम करतात. काल सकाळी कामासाठी म्हणून दुचाकीवरून निघाले होते. तेलगाव जवळ समोरून दुसरी दुचाकी धडकल्याने ते गंभीर जखमी झाले होते. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता ते मंगळवारी सकाळी मयत झाले. मयत कट्याप्पा यांच्या पश्चात पत्नी, ३ मुली आणि १ मुलगा असा परिवार आहे. या अपघाताची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



लाल रंगाच्या वस्तू महाग झाल्या आहेत!

| कल्याण |
|---|
| 167-43-689 |

| मुंबई |
|---|
| 400-43-247 |

## २०२० एमपीएससी परीक्षेचा निकाल

# कोंढार पट्टा नेवरे येथील सख्ख्या बहिणींचे एमपीएससी परीक्षेत यश

### अंजली बाबरचा राज्यात दुसरा क्रमांक

सुराज्य/श्रीपूर

कोंढारपट्टा नेवरे तालुका माळशिरस येथील हरिदास बाबर यांच्या दोन्ही कन्या कु. कौशल्या हरिदास बाबर व कु. अंजली हरिदास बाबर या दोघींनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात आलेल्या पोलीस उपनिरीक्षक परीक्षेत घवघवीत यश मिळवले आहे. त्या दोघी कोंढार पट्टा गावचे माजी सरपंच तात्यासाहेब बाबर यांच्या बहिणी आहेत.

अंजली बाबर हिने महाराष्ट्रा मध्ये मुली मधून ४०८ गुण मिळवून दुसरा क्रमांक मिळवला आहे. माळशिरस तालुक्यातील ग्रामीण भागातील कोंढारपट्टा नेवरे परिसरातील मुलींनी यश मिळवल्याबद्दल या दोघी बहिणींचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

अधिक वृत्त असे की कौशल्या आणि अंजली हिचे प्राथमिक शिक्षण जि प शाळा कोंढारपट्टा येथे झाले तर माध्यमिक शिक्षण नेवरे हायस्कूल नेवरे येथे झाले. त्यानंतर अंजली बाबर हिने उच्च शिक्षण घेण्यासाठी बारामती येथे अकरावी बारावी शिक्षण घेतले, आणि त्यानंतर पुणे येथे मॉडर्न कॉलेज येथे बी सी एस केले.

तर कौशल्या बाबर हिने शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालय माळेवाडी अकलूज येथे अकरावी बारावी शिक्षण घेतले, त्यानंतर मेथवडे येथे बी फार्मसी केले.

त्यानंतर बारामती माळेगाव येथे एम फार्मसी केले. व त्यानंतर अंजली व कौशल्या हिने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा देण्याचा निर्णय घेतला. आणि गेली ७ वर्षापासून आई-वडिलांचे व बहीण भाऊ सर्व बाबर कुटुंबियांचे त्यांना मार्गदर्शन परीक्षेसाठी लाभले. गेली सात वर्ष महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा अभ्यास करून यावर्षी दोघी बहिणींनी पोलीस उपनिरीक्षक पदाची परीक्षा दिली होती त्याचा निकाल आज लागला असून त्यामध्ये दोघी बहिणींनी परीक्षेत घवघवीत यश मिळवले असून त्यांच्या बाबर कुटुंबातील आता सर्वजणच अधिकारी झाले आहेत.



कौशल्या बाबर



अंजली बाबर

### कुटुंबातील एक मुलगा व तीन मुली अधिकारी

कोंढारपट्टा येथील हरिदास बाबर हे शेतकरी एकत्रित कुटुंबात राहतात. त्यांची या अगोदरची मुलगी भावना हरिदास बाबर ही कृषी अधिकारी म्हणून पुणे येथे कार्यरत आहे. व दुसरा मुलगा कृष्णा हरिदास बाबर हा कृषी अधिकारी असून तो कोल्हापूर येथे कार्यरत आहे, त्याची पत्नी प्रणाली कृष्णा बाबर ही गोंदिया येथे कृषी उपसंचालक (वर्ग एक) या पदावर कार्यरत आहे. आज कौशल्या हरिदास बाबर व अंजली हरिदास बाबर या दोन मुली एम पी एस सी च्या परीक्षेत यश मिळवले असून आता हरिदास बाबर यांच्या कुटुंबातील सर्वच मुले अधिकारी बनले आहेत.

CMYK